ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख १७ एप्रिल, १९६३ | अंक ८

## विविध माहिती

**धीराचा वैमानिक**—लंडनच्या विमानतळावरून सुटल्यावर आठच मिनिटांनीं एका बोईंग जेट विमानाच्या पुढील बाजूला विजेचा तडाखा बसला व त्यामुळें विमानाच्या नाकांत २१ इंचांचें भोंक पडलें. परंतु वैमानिकानें न गांगरतां १०,००० गॅलन इंधन खालीं सोडून ३५ मिनिटांनीं विमान परत लंडनच्या विमानतळावर उतरविलें. विमानांत ११० प्रवासी होते.

**ब्रह्मदेशाला नुकसानभरपाई**—युद्धांतील नुकसान-भरपाई म्हणून ब्रह्मदेशाला जपान आणखी १४ कोटी अमेरिकन डॉलर्स देणार आहे. त्याशिवाय जपान ब्रह्मदेशाला ६ वर्षांच्या मुदतीचें ३ कोटी डॉलर्सचें कर्जहि देणार आहे. संबंधित करारावर नुकत्याच सह्या झाल्या.

**चीनचा प्रचारी चित्रपट**—खाटमांडू येथील चित्रपटगृहांत भारत-चीन युद्धाचा एक प्रचारी चित्रपट चीनतर्फे दाखविण्यांत आला. चित्रपटांत भारताला आक्रमक म्हणून दाखविण्यांत आलें असून युद्धाच्या प्रारंभापासून एकतर्फी युद्धबंदीपर्यंतचीं दृश्यें त्यांत समाविष्ट आहेत. कोलंबो परिषदेनें केलेल्या सूचना अगर आफ्रिका-आशिया परिषद् ह्यांचा निर्देशहि चित्रपटांत नाहीं.

**नांगल येथील खताचा कारखाना**—नांगल येथील रासायनिक खताच्या कारखान्यानें गेल्या आर्थिक वर्षातील उत्पादनाच्या उद्दिष्टापेक्षाहि अधिक उत्पादन केलें आहे. ३१ मार्च, १९६३ अखेर २,८०,००० टन खत उत्पादन करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. पण प्रत्यक्ष उत्पादन मात्र जवळजवळ २,००० टनांनीं अधिकच झालें. चालू आर्थिक वर्षासाठी ३,७०,००० टनांचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे.

**खाजगी कारखान्यांना परवाने**—पुलांना व इमारतींना लागणाऱ्या मोठ्या तुळया, मोटारींचे सुटे भाग, पाण्यावरील वाहतुकीसाठी लागणारीं डिझेल एंजिनें, मोटारींचे टायर्स व ट्यूब्स हा माल तयार करण्यासाठी भारत सरकारनें खाजगी मालकीच्या कांहीं कारखान्यांना परवाने दिले आहेत. त्यांपैकी एक कारखाना राजस्थानांत व दुसरा मद्रास राज्यांत काढण्यांत यावयाचा आहे.

**अंतरिक्ष संशोधनासाठी शिक्षण** - अंतरिक्ष संशोधनाचे शिक्षण घेण्यासाठी इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रिसर्च ह्या संस्थेतर्फे ५ भारतीय शास्त्रज्ञांना अमेरिकेंत पाठविण्यांत आले आहे. अमेरिकेच्या अंतरिक्ष संशोधनसंस्थेंत ते काम करणार आहेत. चालू वर्षाच्या अंत केरळमधून अंतरिक्ष संशोधनासाठी पहिला अग्निबाण सोडण्यांत येणार आहे.

**जर तयार करण्याचा कारखाना**—सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा जर तयार करण्याचा कारखाना काढण्याच्या शक्यतेचा मद्रास सरकार विचार करीत आहे. कारखाना काढण्याच्या कामीं खरी अडचण परदेशीय हुंडणावळीची आहे. त्यासाठी लागणारी यंत्रसामग्री आयात करावी लागणार आहे. पण, यंत्रसामग्री आयात करतां न आल्यास जुनी यंत्रसामग्री मिळविण्याचा प्रयत्न करण्यांत येणार आहे.

**सीलोनला भारताची साखर**—भारतानें सीलोनला ४,००० टन शुद्ध साखर पुरविण्याचें मान्य केलें आहे. शुद्ध साखरेला कच्च्या साखरेपेक्षा टनामागें १० पौंड अधिक किंमत पडते. भारताला स्वतःला लागणाऱ्या साखरेंतून ही साखर पुरविण्यांत येणार आहे. कारण, इतर देशांना निर्यात करावयाची साखर आता निश्चित करण्यांत आली आहे.

**पंजाबमधील मुलांना खुराक**—पंजाबमधील शाळांतून १८ लाख मुलें शिकत असतात. त्यांपैकी १० लाख मुलें मांसाहार करणारीं आहेत. ह्या मुलांना रोज एका अंड्याचा खुराक देण्याचें राज्यसरकारनें ठरविलें आहे. जे शेतकरी कोंबड्या पाळण्याचा व दुधाचा धंदा करतील त्यांना आर्थिक व तांत्रिक साह्य देण्याची व्यवस्था सरकार करणार आहे.

**सौंदर्यप्रसाधनांचें आमिष**—रशिआंतील विद्यार्थिनींना अभ्यासांत चांगली प्रगति करण्यासाठी सौंदर्य-प्रसाधनांचें आमिष दाखविण्यांत येत आहे. ज्या विद्यार्थिनी विद्यापीठांत वरच्या क्रमांकानें उत्तीर्ण होतील त्यांना ओष्ठशलाखा, प्रसाधनाची पावडर आणि अत्तरें देण्यांत येणार आहेत. रशिआला सौंदर्य प्रसाधनांची निर्यात करणाऱ्या एका ब्रिटिश कंपनीनें ही माहिती प्रकट केली आहे.

**नगरपालिकेच्या करांत वाढ**—राजकोट नगरपालिकेनें घरपट्टी व पाणीपट्टी ह्या करांत ५० टक्के वाढ करण्याचें ठरविलें आहे. वाढलेल्या करांमुळें राजकोटच्या नागरिकांना ४ लाख रुपये अधिक द्यावे लागतील. घरपट्टीमधील वाढीला राज्य सरकारकडून मान्यताहि मिळाली आहे. पाणीपट्टी वाढविण्यासंबंधीं सरकारी मंजुरी मागण्यांत आली आहे.

**अमेरिकेच्या धोरणांत बदल**—मास्कोमधील हंगेरीच्या वकिलातींत नेहमींप्रमाणें वार्षिक स्वागत-समारंभ साजरा करण्यांत आला. त्या वेळीं अमेरिकेचा मॉस्कोंतील वकील हजर होता. १९५६ सालीं हंगेरींतील उठाव रशिआनें शस्त्रबळानें मोडून काढला होता. तेव्हांपासून समारंभाला अमेरिकन वकील येत नसे. अलीकडे हंगेरींतील बंदिवाल्यांना सरकारनें माफी जाहीर केलेली आहे.

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधान: ” इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख १७ एप्रिल, १९६३ | अंक ८

## विविध माहिती

**धीराचा वैमानिक**—लंडनच्या विमानतळावरून सुटल्यावर आठच मिनिटांनीं एका बोईंग जेट विमानाच्या पुढील बाजूला विजेचा तडाखा बसला व त्यामुळें विमानाच्या नाकांत २१ इंचाचें भोक पडलें. परंतु वैमानिकानें न गांगरतां १०,००० गॅलन इंधन खालीं सोडून ३५ मिनिटांनीं विमान परत लंडनच्या विमानतळावर उतरविलें. विमानांत ११० प्रवासी होते.

**ब्रह्मदेशाला नुकसानभरपाई**—युद्धांतील नुकसान-भरपाई म्हणून ब्रह्मदेशाला जपान आणखी १४ कोटी अमेरिकन डॉलर्स देणार आहे. त्याशिवाय जपान ब्रह्मदेशाला ६ वर्षांच्या मुदतीचें ३ कोटी डॉलर्सचें कर्जहि देणार आहे. संबंधित करारावर नुकत्याच सह्या झाल्या.

**चीनचा प्रचारी चित्रपट**—खाटमांडू येथील चित्रपटगृहांत भारत-चीन युद्धाचा एक प्रचारी चित्रपट चीनतर्फे दाखविण्यांत आला. चित्रपटांत भारताला आक्रमक म्हणून दाखविण्यांत आलें असून युद्धाच्या प्रारंभापासून एकतर्फी युद्धबंदीपर्यंतचीं दृश्यें त्यांत समाविष्ट आहेत. कोलंबो परिषदेनें केलेल्या सूचना अगर आफ्रिका-आशिया परिषद् ह्यांचा निर्देशहि चित्रपटांत नाहीं.

**नांगल येथील खताचा कारखाना**—नांगल येथील रासायनिक खताच्या कारखान्यानें गेल्या आर्थिक वर्षांतील उत्पादनाच्या उद्दिष्टापेक्षाहि अधिक उत्पादन केलें आहे. ३१ मार्च, १९६३ अखेर २,८०,००० टन खत उत्पादन करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. पण प्रत्यक्ष उत्पादन मात्र जवळजवळ २,००० टनांनीं अधिकच झालें. चालू आर्थिक वर्षासाठी ३,७०,००० टनांचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे.

**खाजगी कारखान्यांना परवाने**—पुलांना व इमारतींना लागणाऱ्या मोठ्या तुळया, मोटारींचे सुटे भाग, पाण्यावरील वाहतुकीसाठी लागणारीं डिझेल एंजिनें, मोटारींचे टायर्स व ट्यूब्स हा माल तयार करण्यासाठी भारत सरकारनें खाजगी मालकीच्या कांहीं कारखान्यांना परवाने दिले आहेत. त्यांपैकी एक कारखाना राजस्थानांत व दुसरा मद्रास राज्यांत काढण्यांत यावयाचा आहे.

**अंतरिक्ष संशोधनासाठी शिक्षण**—अंतरिक्ष संशोधनाचे शिक्षण घेण्यासाठी इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रिसर्च ह्या संस्थेतर्फे ५ भारतीय शास्त्रज्ञांना अमेरिकेंत पाठविण्यांत आले आहे. अमेरिकेच्या अंतरिक्ष संशोधनसंस्थेंत ते काम करणार आहेत. चालू वर्षाच्या आंत केरळमधून अंतरिक्ष संशोधनासाठी पहिला अग्निबाण सोडण्यांत येणार आहे.

**जर तयार करण्याचा कारखाना**—सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा जर तयार करण्याचा कारखाना काढण्याच्या शक्यतेचा मद्रास सरकार विचार करीत आहे. कारखाना काढण्याच्या कामीं खरी अडचण परदेशीय हुंडणावळीची आहे. त्यासाठी लागणारी यंत्रसामग्री आयात करावी लागणार आहे. पण, यंत्रसामग्री आयात करतां न आल्यास जुनी यंत्रसामग्री मिळविण्याचा प्रयत्न करण्यांत येणार आहे.

**सीलोनला भारताची साखर**—भारतानें सीलोनला ४,००० टन शुद्ध साखर पुरविण्याचें मान्य केलें आहे. शुद्ध साखरेला कच्च्या साखरेपेक्षा टनामागें १० पौंड अधिक किंमत पडते. भारताला स्वत:ला लागणाऱ्या साखरेंतून ही साखर पुरविण्यांत येणार आहे. कारण, इतर देशांना निर्यात करावयाची साखर आता निश्चित करण्यांत आली आहे.

**पंजाबमधील मुलांना खुराक**—पंजाबमधील शाळांतून १८ लाख मुलें शिकत असतात. त्यांपैकी १० लाख मुलें मांसाहार करणारीं आहेत. ह्या मुलांना रोज एका अंड्याचा खुराक देण्याचें राज्यसरकारनें ठरविलें आहे. जे शेतकरी कोंबड्या पाळण्याचा व दुधाचा धंदा करतील त्यांना आर्थिक व तांत्रिक साह्य देण्याची व्यवस्था सरकार करणार आहे.

**सौंदर्यप्रसाधनांचें आमिष**—रशिआंतील विद्यार्थिनींना अभ्यासांत चांगली प्रगति करण्यासाठी सौंदर्य-प्रसाधनांचें आमिष दाखविण्यांत येत आहे. ज्या विद्यार्थिनी विद्यापीठांत वरच्या क्रमांकानें उत्तीर्ण होतील त्यांना ओष्ठशलाखा, प्रसाधनाची पावडर आणि अत्तरें देण्यांत येणार आहेत. रशिआला सौंदर्य प्रसाधनांची निर्यात करणाऱ्या एका ब्रिटिश कंपनीनें ही माहिती प्रकट केली आहे.

**नगरपालिकेच्या करांत वाढ**—राजकोट नगरपालिकेनें घरपट्टी व पाणीपट्टी ह्या करांत ५० टक्के वाढ करण्याचें ठरविलें आहे. वाढलेल्या करांमुळें राजकोटच्या नागरिकांना ४ लाख रुपये अधिक द्यावे लागतील. घरपट्टीमधील वाढीला राज्य सरकारकडून मान्यताहि मिळाली आहे. पाणीपट्टी वाढविण्यासंबंधीं सरकारी मंजुरी मागण्यांत आली आहे.

**अमेरिकेच्या धोरणांत बदल**—मास्कोमधील हंगेरीच्या वकिलातींत नेहमींप्रमाणें वार्षिक स्वागत-समारंभ साजरा करण्यांत आला. त्या वेळीं अमेरिकेचा मॉस्कोंतील वकील हजर होता. १९५६ सालीं हंगेरींतील उठाव रशिआनें शस्त्रबलानें मोडून काढला होता. तेव्हांपासून समारंभाला अमेरिकन वकील येत नसे. अलीकडे हंगेरींतील बंडवाल्यांना सरकारनें माफी जाहीर केलेली आहे.

# दि सरदार
# कारबोनिक गॅस कंपनी लि.

उत्पादक

कारबोनिक ॲसिड गॅस

सुका बर्फ, सोडा वॉटर मशिनरी

आणि

खनिज पाण्याच्या आवश्यकतेसंबंधीं विक्रेते

रजिस्टर्ड हेड ऑफिस आणि एजन्टस्चें ऑफिस

सर विठ्ठलदास चेंबर्स, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

फॅक्टरी ऑफिस : कॅनॉट रोड, माझगांव, मुंबई. टे. नं. ४०८१२

शाखा आणि फॅक्टरी

१ केडल रोड, दादर, फ्रिझाइट फॅक्टरी टे. ६११२९
२ काम्पटी फॅक्टरी एरिया, रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस, काम्पटी ( कँट ) टे. ८
३ दिल्ली–रामबाग रोड, बंगेश पूल टे. २२४७०२
४ कलकत्ता–१०३ ए फोरशोर रोड, शिवपूर, हावरा. टे. ६७–२२४७
५ विजयवाडा–गुणदला, कृष्णाजी स्ट्रीट, आंध्र प्रदेश टे. २०४१
६ रावळपिंडी–डलहाऊसी रोड.

सर्व शाखांसाठी आणि फॅक्टऱ्यांसाठी टेलिग्राफिक पत्ता : ' कारबोनिक '

: प्रगतीचा आणखी एक टप्पा :

पणजी व मडगांव–गोवा येथें बँकेच्या शाखा लौकरच सुरू होत आहेत.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

पुणें–२.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | : | रु. ५० लाखांचे वर |
| गंगाजळी | : | रु. २६ लाखांचे वर |
| खेळतें भांडवल | : | रु. २५ कोटींचे वर |

व्याजाचे दर :

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | : | ३ टक्के |
| मुदत ठेव १ ते ५ वर्षें | : | ४। टक्के ते ५। टक्के |

★ महाराष्ट्र ★ म्हैसूर ★ आंध्र व ★ मध्यप्रदेश यांमध्यें एकूण ८१ शाखा.
विदेशविनिमयासुद्धां बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

चिं. वि. जोग
जनरल मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १७ एप्रिल, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


### चोरट्या सोन्याची आयात थांबेल काय ?

सुप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ प्रा. शेणॉय बंगलोर येथें बोलतांना म्हणाले कीं सुवर्ण–नियंत्रण नियमांच्यामुळें भारतांत चोरटें सोनें आयात होण्याचें बंद होणार नाहीं. सोन्याची अधिकृत किंमत आणि देशांतील बाजारांत असणारी सोन्याची किंमत ह्यांच्यांत भलतीकडेच तफावत आहे. ही तफावत नाहींशी झाल्याशिवाय सोन्याची बेकायदा आयात थांबणार नाहीं. सोन्याची बाजारांतील किंमत घटवून ती अधिकृत किंमतीबरोबर आणण्याचे सरकारचे प्रयत्न फसलेले आहेत. सोन्याच्या बाबतींत आणखी कडक धोरण स्वीकारण्याचें जाहीर करण्यांत आलेलें असलें तरी त्याचाहि परिणाम झालेला नाहीं. सोन्याची चोरटी आयात थांबविण्यासाठीं योजण्यांत आलेले उपाय यशस्वी झालेले नाहींत; कारण, अशी आयात करणाऱ्यांना अजूनहि भरमसाठ नफा होत आहे. सुवर्ण–नियंत्रणाबाबतचे नियम असे आहेत कीं ज्या व्यवहारांची नोंद ठेवण्यांत येते त्यांच्या बाबतींतच नियंत्रण शक्य होतें वस्तुस्थिति अशी आहे कीं चोरट्या सोन्याची नोंद ठेवण्यांत येत नाहीं व तशी ती ठेवतांहि येणार नाहीं. अधिकृत किंमत आणि बाजारांतील किंमत ह्यांच्यांतील तफावत नाहींशी करण्यासाठीं दोन उपाय योजतां येतील; पहिला उपाय म्हणजे चलनवृद्धि थांबविण्यांत आली पाहिजे; दुसरा उपाय असा कीं सोन्याची अधिकृत किंमत वाढवून ती बाजारांतील किंमतीच्या जवळपास आणण्यांत आली पाहिजे. ह्या दोन किंमतीच्या पातळींत जोंपर्यंत मोठा फरक आहे तोंपर्यंत चोरमार्गानें सोनें आयात करून नफा मिळविण्याचें आकर्षण कमी होणार नाहीं.

### कांडला येथील मुक्त व्यापार प्रदेश

गुजरात राज्यांतील कांडला बंदराच्या आसमंतांत मुक्त व्यापार प्रदेश स्थापन करण्याचा निर्णय भारत सरकार शक्य तितक्या लवकर अमलांत आणणार आहे. ह्या प्रदेशांत एकूण ६०० एकर जागेचा समावेश व्हावा अशी मूळची कल्पना होती. परंतु सध्यां ३०० एकर जागेचाच समावेश करण्यांत येणार आहे. ही जागा फार लहान असल्यामुळें तेथें काढण्यांत यावयाचे उद्योगधंदे हे छोटेखानी स्वरुपाचे असणें अपरिहार्यच आहे. ज्या उद्योगधंद्यांचा माल निर्यात करतां येण्यासारखा असेल अशा उद्योगधंद्यांना मुक्त व्यापार विभागांत प्राधान्य देण्यांत येणार आहे. परदेशांत वास्तव्य करणाऱ्या ज्या उद्योगधंदेवाल्यांना येथें कारखाने काढावयाचे असतील त्यांना अग्रहक्क देण्यांत येणार आहे. ज्या उद्योगधंद्यांचा माल आयात करून त्यावर संस्कार करून पुन्हा निर्यात करता येईल अशा प्रकारच्या उद्योगधंद्यांनाहि सवलती देण्यांत येणार आहेत. ह्या मुक्त व्यापार विभागांत ३० ते ४० छोटे व मध्यम प्रतीचे कारखाने काढण्यांत येतील असा अंदाज आहे. कांडला येथील पहिला प्रयोग यशस्वी झाला तर भारतामध्यें इतर कांहीं ठिकाणीं अशाच प्रकारचे मुक्त व्यापार विभाग स्थापन करण्यांत येण्याचा संभव आहे. जगांत अशा प्रकारचे ६४ मुक्त व्यापार विभाग आहेत. कांडला हा त्यांपैकी सर्वांत लहान विभाग होईल. मुक्त बंदर आणि मुक्त व्यापार विभाग ह्यांत फरक आहे. मुक्त बंदरांस कोणताहि माल जकातीविना आयात करता येतो व देशांतील भागांत विकता येतो. मुक्त व्यापार विभागांत कांहीं ठराविक मालच जकात न देतां आयात करतां येतो व त्यावर संस्करण करून बाहेर पाठविला जातो. देशाच्या आंतील भागांत तो विकता येत नाहीं.

### उद्योगधंदे व शेती ह्यांची सुसंगत वाढ हवी

वालचंद स्मारक व्याख्यानमालेंत बोलतांना भारताचे अन्न-मंत्री श्री. एस. के. पाटील ह्यांनीं शेती व उद्योगधंद्यांच्या सुसंगत वाढीबद्दल आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले कीं, हिंदमधील शेतीच्या व्यवसायाची प्रगति करण्याचें काम सोपें नाहीं. सुमारें ६·५ कोटी शेतकरी देशांतील ३५·४ कोटी एकर जमिनीवर राबत आहेत. परंतु त्यांच्या उत्पादक प्रयत्नांना परंपरागत परिस्थितीच्या जाचक मर्यादा आहेत. त्या ओलांडून पुढें जाण्यासाठी शेतकऱ्यांना शिक्षण देऊन त्यांच्या मनोवृत्तींत बदल घडवून आणला पाहिजे. ग्रामीण भागांतील जीवन नियोजित करतांना एक गोष्ट मुद्दाम लक्षांत ठेवली गेली पाहिजे. ती अशी कीं, हे नियोजन शेती व तदनुषंगिक व्यवसाय ह्यांच्यापुरतेंच मर्यादित राहतां कामा नये. ज्या उद्योगधंद्यांना शेतीच्या व्यवसायांत महत्त्व असेल अशा उद्योगधंद्यांचीहि ग्रामीण जीवनाशीं सांगड घातली गेली पाहिजे. ह्याचाच अर्थ असा कीं, शेती व उद्योगधंदे ह्यांची वाढ सुसंगत रीत्या करण्यांत आली पाहिजे. उद्योगधंद्यांची वाढ करतांनासुद्धां ती वाढ शेतीला उपकारक होईल अशा रीतीनें करण्यांत आली पाहिजे. उद्योगधंद्यांची अशी वाढ करण्यांत आली तर ती फक्त मोठ्या शहरांपुरतीच मर्यादित राहणार नाहीं. ह्या प्रकारच्या औद्योगीकरणामुळें छोटीं शहरें नव्यानें उदयास येतील व त्यामधून शहरी व ग्रामीण जीवनाचीं आकर्षक वैशिष्ट्यें एकवटलेलीं आढळून येतील त्यामुळें नागरी व ग्रामीण जीवनाची भरभराट एकदमच होईल.

### कर्जावरील व्याजासाठी मुदतीची मागणी

आंध्र प्रदेशांतील नागार्जुनसागर धरणासाठी मध्यवर्ती सरकारनें दिलेल्या कर्जाऊ रकमेवरील व्याज धरणांतून शेतीसाठी पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत घेण्यांत येऊं नये, अशी विनंती राज्य सरकारतर्फे करण्यांत आली आहे. ह्या धरणावर खर्च झालेल्या ६० कोटी रुपयांपैकी ५४ कोटी रुपये मध्यवर्ती सरकारनें दिलेले आहेत. शिवाय १९६१ अखेरपर्यंतचें कर्जावरील व्याज देण्यासाठीहि ५ कोटी रुपये देण्यांत आलेले आहेत. चालू सालीं कर्जावरील व्याजाची रक्कम २ कोटी रुपये होईल असा अंदाज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १७ एप्रिल, १९६३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## चोरट्या सोन्याची आयात थांबेल काय ?

सुप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ प्रा. शेणॉय बंगलोर येथें बोलतांना म्हणाले कीं सुवर्ण-नियंत्रण नियमांच्यामुळें भारतांत चोरटें सोनें आयात होण्याचें बंद होणार नाहीं. सोन्याची अधिकृत किंमत आणि देशांतील बाजारांत असणारी सोन्याची किंमत ह्यांच्यांत भलतीकडेच तफावत आहे. ही तफावत नाहींशी झाल्याशिवाय सोन्याची बेकायदा आयात थांबणार नाहीं. सोन्याची बाजारांतील किंमत घटवून ती अधिकृत किंमतीबरोबर आणण्याचे सरकारचे प्रयत्न फसलेले आहेत. सोन्याच्या बाबतींत आणखी कडक धोरण स्वीकारण्याचें जाहीर करण्यांत आलेलें असलें तरी त्याचाहि परिणाम झालेला नाहीं. सोन्याची चोरटी आयात थांबविण्यासाठीं योजण्यांत आलेले उपाय यशस्वी झालेले नाहींत; कारण, अशी आयात करणाऱ्यांना अजूनहि भरमसाठ नफा होत आहे. सुवर्ण-नियंत्रणाबाबतचे नियम असे आहेत कीं ज्या व्यवहारांची नोंद ठेवण्यांत येते त्यांच्या बाबतींतच नियंत्रण शक्य होतें वस्तुस्थिति अशी आहे कीं चोरट्या सोन्याची नोंद ठेवण्यांत येत नाहीं व तशी ती ठेवतांहि येणार नाहीं. अधिकृत किंमत आणि बाजारांतील किंमत ह्यांच्यांतील तफावत नाहींशी करण्यासाठीं दोन उपाय योजतां येतील; पहिला उपाय म्हणजे चलनवृद्धि थांबविण्यांत आली पाहिजे; दुसरा उपाय असा कीं सोन्याची अधिकृत किंमत वाढवून ती बाजारांतील किंमतीच्या जवळपास आणण्यांत आली पाहिजे. ह्या दोन किंमतीच्या पातळींत जोंपर्यंत मोठा फरक आहे तोंपर्यंत चोरमार्गानें सोनें आयात करून नफा मिळविण्याचें आकर्षण कमी होणार नाहीं.

## कांडला येथील मुक्त व्यापार प्रदेश

गुजरात राज्यांतील कांडला बंदराच्या आसमंतांत मुक्त व्यापार प्रदेश स्थापन करण्याचा निर्णय भारत सरकार शक्य तितक्या लवकर अमलांत आणणार आहे. ह्या प्रदेशांत एकूण ६०० एकर जागेचा समावेश व्हावा अशी मूळची कल्पना होती. परंतु सध्यां ३०० एकर जागेचाच समावेश करण्यांत येणार आहे. ही जागा फार लहान असल्यामुळें तेथें काढण्यांत यावयाचे उद्योगधंदे हे छोटेखानी स्वरुपाचे असणें अपरिहार्यच आहे. ज्या उद्योगधंद्यांचा माल निर्यात करतां येण्यासारखा असेल अशा उद्योगधंद्यांना मुक्त व्यापार विभागांत प्राधान्य देण्यांत येणार आहे. परदेशांत वास्तव्य करणाऱ्या ज्या उद्योगधंदेवाल्यांना येथें कारखाने काढावयाचे असतील त्यांना अग्रहक्क देण्यांत येणार आहे. ज्या उद्योगधंद्यांचा माल आयात करून त्यावर संस्कार करून पुन्हा निर्यात करता येईल अशा प्रकारच्या उद्योगधंद्यांनाहि सवलती देण्यांत येणार आहेत. ह्या मुक्त व्यापार विभागांत ३० ते ४० छोटे व मध्यम प्रतीचे कारखाने काढण्यांत येतील असा अंदाज आहे. कांडला येथील पहिला प्रयोग यशस्वी झाला तर भारतामध्यें इतर कांहीं ठिकाणीं अशाच प्रकारचे मुक्त व्यापार विभाग स्थापन करण्यांत येण्याचा संभव आहे. जगांत अशा प्रकारचे ६४ मुक्त व्यापार विभाग आहेत. कांडला हा त्यांपैकी सर्वांत लहान विभाग होईल. मुक्त बंदर आणि मुक्त व्यापार विभाग ह्यांत फरक आहे. मुक्त बंदरांस कोणताहि माल जकातीविना आयात करता येतो व देशांतील भागांत विकता येतो. मुक्त व्यापार विभागांत कांहीं ठराविक मालच जकात न देतां आयात करतां येतो व त्यावर संस्करण करून बाहेर पाठविला जातो. देशाच्या आंतील भागांत तो विकता येत नाहीं.

## उद्योगधंदे व शेती ह्यांची सुसंगत वाढ हवी

वालचंद स्मारक व्याख्यानमालेंत बोलतांना भारताचे अन्न-मंत्री श्री. एस. के. पाटील ह्यांनीं शेती व उद्योगधंद्यांच्या सुसंगत वाढीबद्दल आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले कीं, हिंद-मधील शेतीच्या व्यवसायाची प्रगति करण्याचें काम सोपें नाहीं. सुमारें ६·५ कोटी शेतकरी देशांतील ३५·४ कोटी एकर जमिनीवर राबत आहेत. परंतु त्यांच्या उत्पादक प्रयत्नांना परंपरागत परिस्थिती-च्या जाचक मर्यादा आहेत. त्या ओलांडून पुढें जाण्यासाठी शेतकऱ्यांना शिक्षण देऊन त्यांच्या मनोवृत्तींत बदल घडवून आणला पाहिजे. ग्रामीण भागांतील जीवन नियोजित करतांना एक गोष्ट मुद्दाम लक्षांत ठेवली गेली पाहिजे. ती अशी कीं, हे नियोजन शेती व तदनुषंगिक व्यवसाय ह्यांच्यापुरतेंच मर्यादित राहतां कामा नये. ज्या उद्योगधंद्यांना शेतीच्या व्यवसायांत महत्त्व असेल अशा उद्योगधंद्यांचीहि ग्रामीण जीवनाशीं सांगड घातली गेली पाहिजे. ह्याचाच अर्थ असा कीं, शेती व उद्योगधंदे ह्यांची वाढ सुसंगत रीत्या करण्यांत आली पाहिजे. उद्योगधंद्यांची वाढ करतांनासुद्धां ती वाढ शेतीला उपकारक होईल अशा रीतीनें करण्यांत आली पाहिजे. उद्योगधंद्यांची अशी वाढ करण्यांत आली तर ती फक्त मोठ्या शहरापुरतीच मर्यादित राहणार नाहीं. ह्या प्रकारच्या औद्योगीकरणामुळें छोटीं शहरें नव्यानें उदयास येतील व त्यामधून शहरी व ग्रामीण जीवनाचीं आकर्षक वैशिष्ट्यें एकवटलेलीं आढळून येतील त्यामुळें नागरी व ग्रामीण जीवनाची भरभराट एकदमच होईल.

## कर्जावरील व्याजासाठी मुदतीची मागणी

आंध्र प्रदेशांतील नागार्जुनसागर धरणासाठी मध्यवर्ती सरकारनें दिलेल्या कर्जाऊ रकमेवरील व्याज धरणांतून शेतीसाठी पाणी-पुरवठा सुरू होईपर्यंत घेण्यांत येऊं नये, अशी विनंती राज्य सरकारतर्फे करण्यांत आली आहे. ह्या धरणावर खर्च झालेल्या ६० कोटी रुपयांपैकी ५४ कोटी रुपये मध्यवर्ती सरकारनें दिलेले आहेत. शिवाय १९६१ अखेरपर्यंतचें कर्जावरील व्याज देण्या-साठीहि ५ कोटी रुपये देण्यांत आलेले आहेत. चालू सालीं कर्जावरील व्याजाची रक्कम २ कोटी रुपये होईल असा अंदाज आहे.

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया—कार्य व व्यवहार

### मराठी आवृत्ति प्रसिद्ध झाली

रिझर्व्ह बँक गेलीं पंचवीस वर्षें देशाची केंद्रीय बँक म्हणून कार्य करीत आहे. पहिलीं कांहीं वर्षें संघटनात्मक प्रश्नांना तोंड देण्यांत गेलीं. नंतर जागतिक युद्ध झालें आणि अखेर फाळणीमुळें निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड द्यावें लागलें. अशा प्रकारें या पंचवीस वर्षांतील निम्म्यांहून अधिक वर्षें खर्ची पडलीं. त्यामुळें देशाच्या गरजा योग्य प्रकारें भागविणारी आणि टिकाऊ अशी बँकिंगची संघटना निर्माण करण्याकडे रिझर्व्ह बँकेला गेल्या दहा वर्षांतच काय तें विशेष लक्ष देतां आलें. ह्या कार्याची बरीच प्रगति झाली आहे.

कांहीं दिवसांपूर्वी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें आपलीं कार्यें व व्यवहार यांचें विवरण करणारें एक पुस्तक प्रकाशित केलें. तें इंग्रजींत लिहिलेलें होतें. या पुस्तकाची देशाच्या प्रमुख प्रादेशिक भाषांत भाषांतरें करण्याची व्यवस्था रिझर्व बँकेनें केली आहे.

या पुस्तकांत देशाच्या केन्द्रीय बँकिंगच्या ऐतिहासिक विकासाचें चित्रण केलेलें आहे. तसेंच, १९३५ सालच्या एप्रिलमध्यें रिझर्व्ह बँकेची स्थापना झाल्यापासून तिच्या स्वरूपांत आणि कार्याच्या कक्षांत कोणते फरक झालेले आहेत तें देखील या पुस्तकाच्या द्वारें स्पष्ट होईल. रिझर्व्ह बँकेचें सध्यांचें कार्यक्षेत्र व्यापक आणि विविधतापूर्ण आहे. कारण केंद्रीय बँकेच्या परंपरागत कार्यांत नव्या कार्यांची भर पडली आहे. चलन आणि पतचलन यांचें नियमन करण्याचें परंपरागत कार्य तर रिझर्व्ह बँकेला पार पाडावें लागतेंच पण शिवाय केवळ व्यापार व उद्दीम यांच्याच नव्हे तर शेती व उद्योग यांच्याहि गरजा पुरेपूर भागवूं शकेल अशा मजबूत बँकिंगव्यवस्थेचा विकास करणें ही देखील तिचीच जबाबदारी आहे. खेड्यांना वित्त पुरविण्याबाबत रिझर्व्ह बँकेनें जें कार्य केलें आहे तें विशेष उल्लेखनीय आहे. रिझर्व्ह बँकेवर ही जबाबदारी पडण्याचें कारण असें कीं शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया आहे आणि शेतीसाठी उपलब्ध असलेल्या पतचलनाच्या सोयींचा विकास करून यांत सुसूत्रता आणण्याची फार गरज आहे. उद्योगांना दीर्घ मुदतीचीं कर्जें देणाऱ्या खास संस्था उभारण्यास देखील बँकेनें सक्रिय हातभार लावलेला आहे. चलन व पतचलन यांचें नियमन करणें आणि सरकारची बँकर या नात्यानें व्यवहार करणें हीं कार्यें रिझर्व्ह बँकेची आहेत. त्यामुळें सर्वसाधारणपणें आर्थिक प्रश्नांवर आणि विशेष करून वित्तविषयक प्रश्नांवर सरकारला सल्ला देण्याचें तिचें जें कार्य आहे त्याचें महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

रिझर्व्ह बँकेचीं हीं अनेकाविध कार्यें आणि तीं पार पाडण्याकरितां तिच्या अंतर्गत संघटनेला पडलेली मुरड यासंबंधींचें विवरण या पुस्तकाच्या बारा प्रकरणांत बऱ्याचशा विस्तारानें केलेलें आहे.

हें मराठी भाषांतर श्री. गंगाधर गाडगे ह्यांनीं केलें आहे. पुस्तकाची पृष्ठसंख्या १४४ असून किंमत रु. १ आहे.

### मोठ्या जमीनमालकांवर कर

उत्तर प्रदेश विधानसभेनें राज्यांतील मोठ्या जमीनमालकांवर कर बसविणारा कायदा मंजूर केला आहे. ज्या जमीनमालकांच्या जमिनी ३० एकरांहून अधिक मोठ्या असतील आणि ज्यांचें वार्षिक उत्पन्न ३,६०० रुपयांहून अधिक असेल त्यांना जमिनीबाबत हा कर द्यावा लागणार आहे. ज्या मानानें जमीन जास्त असेल त्या मानानें कराचा दरहि अधिक ठेवण्यांत आला आहे.


**कण आणि क्षण**

लेखकः—श्री. वा. काळे

**तिसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली !**

पृ. सं. १६०. कि. रु. ३=५०

व्हीनस प्रकाशन,

३८१ क, शनिवार पुणें २.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक

**दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

लाख

चपल भांडवल... रु. — ९.५८

राखीव निधी ... रु. — १०.९१

ठेवी........ रु. —३०५.४९

खेळतें भांडवल . रु. —३३५.००

मुख्य कचेरी
सारस्वत बँक गृह,
गिरगांव, मुंबई-४

शाखा: फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहिम, पुणें व बेळगांव
महिला शाखा: गिरगांव, मुंबई-४

**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड, मुंबई**

[ दि विदर्भ सहकारी बँक लि. सम्मीलित ]

: मुख्य कचेरी : : विभागीय कचेरी :
१, बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई. महाल : नागपूर.
टेलिफोन नं.२५५४७४-७५. तारेचा पत्ता : फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :
(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग
(५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ
(८) मुलुंड (९) चेंबूर.

चेअरमन : प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ३ कोटी ९९ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ११ लाख |
| ठेवी | ... | ६१ कोटी १९ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ६५ कोटी १८ लाख |

महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, चिलें, वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

## बँकिंगच्या व्यवसायांत तरुणांना वाव

( आर. एस. बालसेकर, दि बँक ऑफ इंडिया लि., मुंबई )

बँकेंत एखाद्याला मिळणारें वेतन दोन गोष्टींवर निश्चित होत असतें: बँकेचा दर्जा आणि आपल्याकडे सोंपविण्यांत आलेलें काम. बँकेंत विविध स्वरूपाच्या जागा असतात. शिपायापासून तों मोठ्या अधिकाऱ्यापर्यन्त जागा बँकेंत असतात. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जागा उच्च दर्जाची शैक्षणिक लायकी आणि अनुभव असलेल्यांनाच सहसा देण्यांत येत असतात. त्यांच्या हाताखाली दुय्यम अधिकारी असतात व त्यांचें वेतन दरमहा रुपये ३५०-०० पासून ते रु. २,०००=०० पेक्षा अधिक असूं शकतें. त्याखाली लेखानिक असतात. त्यांचें वेतन बँक ट्रायब्यूनलच्या निवाड्यांवर निर्भर असतें. बँक ट्रायब्यूनलनें बँकांची वर्गवारी तीन प्रमुख वर्गांमध्यें केली आहे. ए., बी. आणि सी. याशिवाय अपवादात्मक एक चौथा वर्ग आहे. त्याचप्रमाणें देशाचीहि ग्रामीण भाग, शहर व मोठें शहर अशी लोकसंख्येवरून तीन प्रकारची वर्गवारी केलेली आहे. लेखानिकाचें वेतन बँकेच्या वर्गानुसार आणि त्यांतहि तो बँकेच्या कोणत्या शहराच्या शाखेंत आहे यावरून निश्चित केलें जातें. अलीकडच्या ताज्या निवाड्यानुसार लेखनिकाला मुंबई शहरांत दरमहा रु. १८०-०० वेतन सहज मिळूं शकतें. वेतनाशिवाय बोनसहि मिळतो व तो प्रत्येक बँकेंत भिन्न असूं शकतो.

मात्र, बँकेंतल्या या जागा साचेबंद आणि खातेबंद नसतात. त्यामुळें नव्यानेंच या नोकरींत शिरलेल्या तरुणाला वर चढायला भरपूर वाव असतो. उदाहरण द्यायचें झाल्यास, एक कारकून म्हणून लागलेला तरुण बढती मिळून ज्युनियर ऑफिसर होऊं शकतो. आणखी बढती मिळाल्यास त्याला सिनियर ऑफिसरहि होतां येतें. एखादी व्यक्ति बँकेंत कारकून म्हणून लागली व बढती मिळत मिळत मासिक रु. २,०००-०० अथवा रु. ३,०००-०० ची सर्ववरिष्ठ जागा त्या व्यक्तीस मिळाली अशीं उदाहरणें थोडींथोडकीं नाहींत. तेव्हां बँकेंत नोकरी करणारांसाठी संधींना तोटा नाहीं. बुद्धिवान् व अंग मोडून काम करणाऱ्या तरुणांना या व्यवसायांत अपरिमित वाव आहे.

बँकेंतील कामकाजाच्या वेळा बँक अवॉर्ड आणि राज्याराज्यांत असलेले गुमास्ते कायदे यांनीं निर्बंधित असतात. सामान्यतः शनवारखेरीज रोज साडेसात तास बँकेंत काम करावें लागतें. त्यांत एक तासाचें मध्यन्तर असतें. शनिवारीं फक्त चार तास काम असतें. एखाद्या कारखान्यांत अथवा व्यापारी संस्थेंत कामगारांना ज्या विविध सवलती मिळतात त्या बँकेंतील कर्मचाऱ्यांनाहि मिळत असतात. दरवर्षीं भरपूर किरकोळ, हक्काची आणि आजारपणाची रजा मिळते. इतर ऑफिसांत काम करणाऱ्यांच्या मानानें बँकेंत काम करणारांना अधिक सुट्या असतात. उदाहरणार्थ, मुंबई शहरांत बँकांना एकूण २५ सुट्या वर्षाकांठीं मिळतात. बँक-कारकुनांना प्रॉव्हिडंट फंड दिला जातो व निवृत्तीनंतर ग्रॅच्युइटीहि दिली जाते. कांहीं बँका निवृत्तिवेतनहि देत असतात. शिवाय अनेक बँका आपल्या नोकरांसाठी मोफत वैद्यकीय उपचाराचीहि सोय करून देतात. आपल्या नोकरांसाठी स्वस्त दराच्या घरांचीहि व्यवस्था कांहीं बँकांनीं केलेली आहे.

एखाद्या व्यापारी संस्थेंतल्या नोकरीपेक्षा बँकेंतल्या नोकरींत अधिक शाश्वती असते. कांहीं तसेंच बेजबाबदार वर्तन घडल्याशिवाय बँक कर्मचाऱ्याला नोकरीवरून सहसा काढलें जात नाहीं. एकदा नोकरी मिळाली व कायम झाला कीं त्याच नोकरींत तो शेवटपर्यन्त राहूं शकतो. तथापि, सरकारी नोकराप्रमाणें बँकेच्या नोकराची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं बदली होऊं शकते.

आपल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेंत बँकिंग हा असा विभाग आहे कीं तो एकसारखा विकसित होत आहे. या व्यवसायाची नोकर सामावून घेण्याची शक्तीहि वाढती आहे. भारतांत १९५१ मध्यें ४,११९ बँकेच्या कचेऱ्या होत्या. १९६० मध्यें त्यांची संख्या ५,०२६ झाली आहे. एका दशकांत झालेली ही वाढ २५ टक्क्यांची असून ती अर्थपूर्ण आहे. बँकांच्या शाखा कचेऱ्या वाढून जो विकास झाला त्यावरूनच या व्यवसायाची नोकर सामावून घेण्याची शक्ति किती आहे याचें यथार्थ चित्र स्पष्ट होणार नाहीं. ऑल इंडिया इंडस्ट्रियल ट्रायब्यूनल ( बँक नोकरी तंटे ) या यंत्रणेनें मिळविलेल्या माहितीवरून बँकांमध्यें काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या ( एक्सेरीज करून सर्व शिड्यूल्ड बँका व बिगर शिड्यूल्ड बँका-एकूण ९३ धरून ) १९५३ सालांत एकूण ५१,५१३ होती. १९६१ च्या अखेरीस या संख्येंत आणखी चौथ्या हिश्श्यानें भर पडली असावी असें गृहित धरण्यांत येतें. कितीतरी बँकांनीं आपले वाढीचे कार्यक्रम हातीं घेतले असून या बँका सतत नवे कर्मचारी सामावून घेत असतात. बँकेच्या कामाची यथार्थ कल्पना येण्यासाठी या नव्या नोकरांना भरपूर शिक्षणहि देण्यांत येत असतें. अलीकडेच कांहीं बँकांनीं स्वतःचींच शिक्षणकेंद्रेंहि स्थापन केलीं आहेत. त्यामुळें नवे नोकर नेमतांना प्रथम त्यांना या केंद्रांत नेमतात. तेथें त्यांना पुस्तकी शिक्षणाबरोबरच भरपूर व्यावहारिक शिक्षणहि दिलें जातें. साहजिकच पूर्वीच्या काळाच्या मानानें आजचा बँककर्मचारी प्रथमपासूनच अधिक आत्मविश्वासानें काम करूं शकतो.

इंग्लंडमध्यें कांहीं बँका हायस्कूल आणि कॉलेज शिक्षण पूर्ण करण्याच्या मार्गावर असलेल्या विद्यार्थ्यांना निमंत्रण पाठवितात व त्यांना बँकिंगव्यवसायांत पडा अशी सूचना करतात. भारतांत अशी आमंत्रण देण्याची पद्धत नाहीं. या व्यवसायांत पडूं इच्छिणाराला आपली शैक्षणिक लायकी नमूद करून प्रथम अर्ज करावा लागतो. अनेक बँकांत नोकरी मिळण्यासाठी कमींत कमी शैक्षणिक लायकी मॅट्रिक ( आतां एस्. एस्. सी. ) तरी असावी लागते. वरिष्ठ जागांसाठी पदवी आवश्यक समजली जाते. बँकपरत्वें यांत फरकहि आहे.

एकदा बँकेंत नोकरी मिळाली कीं इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकिंग या संस्थेनें पुरस्कारित परीक्षांना बँककर्मचाऱ्यांना बसतां येतें. या संस्थेचा डिप्लोमा पास होण्यानें शैक्षणिक लायकींत भर तर पडतेच, पण वरच्या वेतनश्रेणीच्या व अधिकाराच्या जागांवर निवड होण्यासाठींहि या परीक्षा उपकारक ठरतात. आपल्या नियामक जागांवरच्या कर्मचाऱ्यांनीं ही परीक्षा पास केलीच पाहिजे, असा कांहीं बँकांमध्यें आग्रह धरला जातो. इतर बँका ही परीक्षा देणाऱ्या नोकरांना रोख बक्षीस अथवा वेतनवाढ देत असतात.

बँकव्यवसायांत पडूं इच्छिणारांनीं वाणिज्य अथवा कलाशाखेची पदवी मिळवावी असा सल्ला त्यांना देणें युक्त ठरेल. अर्थशास्त्र हा खास विषय घेऊन कला-शाखेंत पदवीधर होण्यानें या व्यवसायांत पडण्यासाठी सुंदर बैठक मिळते. बँकिंग हा खास विषय घेऊन बी. कॉम. होणारांना या धंद्यांतलें एखाद्या विभागाचें खास ज्ञान प्राप्त करणें शक्य होतें. बँकिंगव्यवसायांत पडण्यासाठी इतर अभ्यासक्रम अडथळाभूत आहेत असा मात्र याचा अर्थ नाहीं. परंतु वाणिज्य शाखेंतलें शिक्षण या व्यवसायासाठी फायदेशीर ठरतें हें मात्र खरें.

बँकेंतलें नेहमींचें काम दैनंदिन स्वरूपाचें असतें. त्यामुळें असामान्य अशी बुद्धिमत्ताच खालच्या पातळींतली, नेहमींचीं कामें करण्यासाठी हवी असते असें नाहीं. तथापि उच्च स्वरूपाचा अचूकपणा मात्र हवा असतो. जागरूकता व नीटनेटकेपणाहि पाहिजेच. दुसरी गोष्ट म्हणजे बँकेंतलें काम हें एकोप्यानें ('टीम वर्क') करावयाचें असल्यानें आपल्या सहकाऱ्यांशीं जमवून घेणारा स्वभावहि कर्मचाऱ्यांचा हवा. बँक उत्तम चालण्यासाठी जनतेचा पाठिंबा लागतो. तेव्हां ग्राहकांशीं सौजन्यशून्यतेनें वागण्याची सोय नसते. आनंदी व्यक्तिमत्त्व हा या व्यवसायांत पडणारांसाठी फार मोठा गुण समजला जातो. ज्यांना द्रव्य प्रत्यक्षतः हाताळावें लागतें (सहसा सर्वांनाच ही पाळी येते) ते प्रामाणिक आणि विश्वासू असावे लागतात. एक काळ असा होता कीं बँकेंत नोकरी मिळण्यासाठी अर्जदाराचा सामाजिक दर्जा प्रामुख्यानें विचारांत घेत असत. पण आज मात्र हा गुण निर्णायक समजला जात नाहीं. बुद्धिमत्ता, आवड, मेहनतीनें काम करण्याची तयारी व दम (दम नसल्यास निराश होऊन नोकरी सोडून जाण्याची शक्यताच जास्त) या गुणांची सर्वसामान्य शिदोरी ज्याच्याजवळ आहे त्या प्रत्येकाला आज या व्यवसायांत जागा आहे. आयुष्यांत आपण इतर जे मार्ग चोखाळतों त्यांच्याप्रमाणेंच बँकिंगमध्येंहि आत्मविश्वास पाहिजे असतो. अर्थात् इतरत्र नशिबाचा जसा भाग असतो तसा तो येथेंहि आहेच.

एका अमेरिकन बँकरनें यशस्वी बँकरची व्याख्या पुढील-प्रमाणें केली आहे :—

"यशस्वी बँकर हा एकपंचमांश हिशेबनीस, दोन पंचमांश वकील, तीन पंचमांश राजकीय अर्थशास्त्रज्ञ आणि चार पंचमांश सभ्य गृहस्थ आणि विद्वान् असतो. एकूण दहा पंचमांश. म्हणजे दुप्पट. यापेक्षा कमी असलेला माणूस हा गहाणाटहाणाचा व्यवहार करणारा अथवा बँकेचा प्रमोटर होऊं शकेल; बँकर मात्र नव्हे."

## पलाई बँकप्रकरणीं डायरेक्टरांना नोटीस

### २·३८ कोटी रु. भरपाईची मागणी

आतां लिक्विडेशनमध्यें असलेल्या पलाई सेंट्रल बँक लि. च्या सात डायरेक्टरांवर, दोघा अधिकाऱ्यांवर आणि ऑडिटरावर केरळ हायकोर्टानें नोटीस बजावली आहे. ऑफिशिअल लिक्विडेटरनें केलेल्या अर्जावरून 'मिसफीजन्स' आणि 'ब्रीच ऑफ ट्रस्ट' च्या आरोपांचा जाब विचारण्यांत आला आहे. १९५६ च्या कंपनी कायद्याच्या ५४३ (१) कलमाखाली लिक्विडेटरनें हा अर्ज केलेला आहे. वसूल होण्यास अशक्य अशीं कर्जे देऊन, डिव्हिडंड वांटून आणि कर देऊन ह्या दहा जणांनीं बँकेचें २,३८,००,००० रुपयांचें नुकसान केलें आहे, असें अर्जांत म्हटलें आहे. कंपनी कायद्याप्रमाणें, डायरेक्टरांच्या वर्तनाची चौकशी करून त्यांचेकडून नुकसानीची सव्याज वसुली करविण्याचा कोर्टाला अधिकार आहे. कोर्टानें सुनावणीची पुढील तारीख ३० मे ही ठरविली आहे.


### जपानची मदत चालू राहणार


अपुरा विकास झालेल्या देशांना आर्थिक मदत देण्यासाठी जे आंतरराष्ट्रीय कार्यक्रम आंखण्यांत येतील त्यांत सक्रिय भाग घेण्याचें जपानच्या सरकारनें ठरविलें आहे. अप्रगत देशांच्या बरोबर असणारे व्यापारी संबंध वाढवून ही मदत देण्याचें जपाननचें धोरण आहे. ह्या देशांकडून सवलतीच्या दरानें कर्जाऊ रकमा मिळण्यासाठी वाढत्या प्रमाणावर मागण्या येत असल्यानें सरकारी पातळीवरून कर्जे व उधारी देण्यांत येणार आहे. १९६१ सालीं जपाननें अप्रगत देशांना दिलेल्या आर्थिक मदतीचा आंकडा ३८·२ कोटी डॉलर्स अथवा सुमारें १८१ कोटी रुपये आहे.

### ३,५०० लोकांना जीवदान

माणसाच्या हृदयाचे ठोके बंद पडले कीं त्याला मृत्यु आला असें मानण्यांत येतें. परंतु रशिअन डॉक्टर्सनीं अशा वैद्यकीय-दृष्ट्या 'मृत' अवस्थेंत असलेल्या ३,५०० माणसांना जीवदान दिलें आहे. मृत माणसाच्या शुद्ध रक्तवाहिन्यांत ताजें रक्त सोडणें, हृदय चोळणें, कृत्रिम श्वासोच्छ्वास करविणें, ह्या उपायांचा अवलंब त्यांनीं केला.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था गिरगांव, मुंबई ४.


जगांतील सर्वोत्कृष्ट ठरलेले

उषा
इलेक्ट्रिक पंखे
सवलतीच्या दरांत हप्तेबंदीनें
मिळतात
एजन्टस्: एम्. एन्. पाटसकर आणि कं.
लक्ष्मीरोड, कुंटे चौक
पुणें २.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA
MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

बँकेंतलें नेहमींचें काम दैनंदिन स्वरूपाचें असतें. त्यामुळें असामान्य अशी बुद्धिमत्ताच खालच्या पातळींतली, नेहमींचीं कामें करण्यासाठीं हवी असते असें नाहीं. तथापि उच्च स्वरूपाचा अचूकपणा मात्र हवा असतो. जागरूकता व नीटनेटकेपणाहि पाहिजेच. दुसरी गोष्ट म्हणजे बँकेंतलें काम हें एकोप्यानें ("टीम वर्क) करावयाचें असल्यानें आपल्या सहकाऱ्यांशीं जमवून घेणारा स्वभावहि कर्मचाऱ्यांच' हवा. बँक उत्तम चालण्यासाठीं जनतेचा पाठिंबा लागतो. तेव्हां ग्राहकांशीं सौजन्यशून्यतेनें वागण्याची सोय नसते. आनंदी व्यक्तिमत्त्व हा या व्यवसायांत पडणारांसाठीं फार मोठा गुण समजला जातो. ज्यांना द्रव्य प्रत्यक्षत: हाताळावें लागतें (सहसा सर्वांनाच ही पाळी येते) ते प्रामाणिक आणि विश्वासू असावे लागतात. एक काळ असा होता कीं बँकेंत नोकरी मिळण्यासाठीं अर्जदाराचा सामाजिक दर्जा प्रामुख्यानें विचारांत घेत असत. पण आज मात्र हा गुण निर्णायक समजला जात नाहीं. बुद्धिमत्ता, आवड, मेहनतीनें काम करण्याची तयारी व दम (दम नसल्यास निराश होऊन नोकरी सोडून जाण्याची शक्यताच जास्त) या गुणांची सर्व-सामान्य शिदोरी ज्याच्याजवळ आहे त्या प्रत्येकाला आज या व्यवसायांत जागा आहे. आयुष्यांत आपण इतर जे मार्ग चोखाळतों त्यांच्याप्रमाणेंच बँकिंगमध्येंहि आत्मविश्वास पाहिजे असतो. अर्थात् इतरत्र नाशिबाचा जसा भाग असतो तसा तो येथेंहि आहेच.

एका अमेरिकन बँकरनें यशस्वी बँकरची व्याख्या पुढील-प्रमाणें केली आहे :—

"यशस्वी बँकर हा एकपंचमांश हिशेबनीस, दोन पंचमांश वकील, तीन पंचमांश राजकीय अर्थशास्त्रज्ञ आणि चार पंचमांश सभ्य गृहस्थ आणि विद्वान् असतो. एकूण दहा पंचमांश. म्हणजे दुप्पट. यापेक्षा कमी असलेला माणूस हा गहाणाटहाणाचा व्यवहार करणारा अथवा बँकेचा प्रमोटर होऊं शकेल; बँकर मात्र नव्हे."

जगांतील सर्वोत्कृष्ठ ठरलेले

उषा

इलेक्ट्रिक पंखे

सवलतीच्या दरांत हप्तेबंदीनें मिळतात

एजन्टस्: एम्. एन्. पाटसकर आणि कं.

लक्ष्मीरोड, कुंटे चौक

पुणें २.


## पलाई बँकप्रकरणीं डायरेक्टरांना नोटीस

### २·३८ कोटी रु. भरपाईची मागणी

आतां लिक्विडेशनमध्यें असलेल्या पलाई सेंट्रल बँक लि. च्या सात डायरेक्टरांवर, दोघा अधिकाऱ्यांवर आणि ऑडिटरावर केरळ हायकोर्टानें नोटीस बजावली आहे. ऑफिशिअल लिक्विडेटरनें केलेल्या अर्जावरून 'मिसफीजन्स' आणि 'ब्रीच ऑफ ट्रस्ट' च्या आरोपांचा जाब विचारण्यांत आला आहे. १९५६ च्या कंपनी कायद्याच्या ५४३ (१) कलमाखालीं लिक्विडेटरनें हा अर्ज केलेला आहे. वसूल होण्यास अशक्य अशीं कर्जे देऊन, डिव्हिडंड वांटून आणि कर देऊन ह्या दहा जणांनीं बँकेचें २,३८,००,००० रुपयांचें नुकसान केलें आहे, असें अर्जांत म्हटलें आहे. कंपनी कायद्याप्रमाणें, डायरेक्टरांच्या वर्तनाची चौकशी करून त्यांचेकडून नुकसानीची सव्याज वसुली करविण्याचा कोर्टाला अधिकार आहे. कोर्टानें सुनावणीची पुढील तारीख ३० मे ही ठरविली आहे.

### जपानची मदत चालू राहणार

अपुरा विकास झालेल्या देशांना आर्थिक मदत देण्यासाठीं जे आंतरराष्ट्रीय कार्यक्रम आखण्यांत येतील त्यांत सक्रिय भाग घेण्याचें जपानच्या सरकारनें ठरविलें आहे. अप्रगत देशांच्या बरोबर असणारे व्यापारी संबंध वाढवून ही मदत देण्याचें जपानचें धोरण आहे. ह्या देशांकडून सवलतीच्या दरानें कर्जाऊ रकमा मिळण्यासाठीं वाढत्या प्रमाणावर मागण्या येत असल्यानें सरकारी पातळीवरून कर्जे व उधारी देण्यांत येणार आहे. १९६१ सालीं जपाननें अप्रगत देशांना दिलेल्या आर्थिक मदतीचा आंकडा ३८·२ कोटी डॉलर्स अथवा सुमारें १८१ कोटी रुपये आहे.

### ३,५०० लोकांना जीवदान


माणसाच्या हृदयाचे ठोके बंद पडले कीं त्याला मृत्यु आला असें मानण्यांत येतें. परंतु रशिअन डॉक्टर्सनीं अशा वैद्यकीय-दृष्ट्या 'मृत' अवस्थेंत असलेल्या ३,५०० माणसांना जीवदान दिलें आहे. मृत माणसाच्या शुद्ध रक्तवाहिन्यांत ताजें रक्त सोडणें, हृदय चोळणें, कृत्रिम श्वासोच्छ्वास करविणें, ह्या उपायांचा अवलंब त्यांनीं केला.


माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था गिरगांव, मुंबई ४.



BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



GADRE BANDHU

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

MADHAVNAGAR (S.R.) INDIA

**कोलारच्या खाणीपुढें अनेक समस्या आहेत; भारतांतील सोन्याची किंमत उत्तरविण्याच्या सरकारी धोरणामुळें "गंडस्योपरि पिटिका संवृत्ता" अशी त्यांची स्थिति झाली आहे.**

# कोलार येथील सोन्याच्या खाणी

भारतांत सोन्याचें उत्खनन केव्हां सुरू झालें, ह्याची कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. पहिल्या शतकांत, म्हणजे सुमारें १९०० वर्षांपूर्वी, प्लिनि ह्या रोमन इतिहासकारानें नमूद केलें होतें, "कॅपिटालिया पर्वताच्या पलीकडे ( राजपुतान्यांत ) बऱ्याचशा सोन्याच्या खाणी आहेत आणि त्यांतून खूप सोनें निघतें." सोन्याच्या खाणींचा धंदा त्या वेळीं भरभराटींत असला पाहिजे; पासेरीज त्याची माहिती रोमपर्यंत पोंचती ना. भारतांत येऊन गेलेल्या युरोपियन प्रवाशांनीं सोन्याच्या उत्खननाचा कधींच उल्लेख केलेला नाहीं. उत्तरेकडील शत्रूंच्या स्वाऱ्यांच्या वेळीं ह्या खाणी बुजवून टाकण्यांत आल्या असाव्या.

म्हैसूर-मद्रास भागांत सोन्याच्या कांहीं जुन्या खाणी होत्या; त्यामुळें तेथें आधुनिक पद्धतीच्या उत्खननास चालना मिळाली. जुन्या पद्धतीनें सोन्याचें उत्खनन केलें जाई, तें दगडासमोर लाकडें पेटवून आणि दगड तापल्यावर त्यावर पाणी ओतून. कोरोमंडल खाणींत ( आतां ती नंदिदुर्ग खाणींत समाविष्ट झाली आहे. ) पाण्याच्या हौदांचे अवशेष अजूनहि दृष्टीस पडतात. १८ व्या शतकांत टिपू सुलतानानें खाणींतून सोनें काढण्याचा प्रयत्न केला, पण तो अपेक्षेइतका यशस्वी झाला नाहीं.

कोलार जिल्ह्यांतील भूमिगत सुवर्णसंचयाची पहिली अधिकृत नोंद १८०४ मध्यें प्रसिद्ध झालेल्या एशिॲटिक जर्नलच्या अंकांतील लेफ्टनंट जॉन वॉरनच्या लेखांत सांपडते. म्हैसूरची हद्द आंखीत असतांना तेथें त्याला सोन्याच्या अस्तित्वाची वार्ता कळली; त्यानें सोनें शोधून पाहिलें. पण त्याला सांपडलें नाहीं. पुढें साठ वर्षें सोन्याचा शोध चालूंच राहिला. १८६० मध्यें, बंगलोरच्या कांहीं लष्करी नागरिकांनीं सोन्याच्या शोधासाठीं एक संघटना तयार केली. पण लवकरच त्यांचें भांडवल संपुष्टांत आलें आणि त्यांनींहि सोनें शोधण्याचा नाद सोडून दिला.

कोलारच्या सध्यांच्या खाणींचें श्रेय मायकेल एफ. लाव्हेल यास आहे. बंगलोर येथें स्थायिक झालेला तो एक आयरिश सैनिक होता. न्यूझीलंडमध्यें असतांना त्यानें सुवर्णाच्या उत्खननाची थोडी माहिती मिळविली होती. १८७१ मध्यें त्यानें सोन्याच्या विभागास भेट देऊन म्हैसूर सरकारकडे खनिजें शोधण्याचा परवाना मागितला. त्याप्रमाणें त्याला तो १८७५ मध्यें मिळाला. तो स्वतः श्रीमंत नसल्याकारणानें, त्यानें भांडवल उभारण्याचे प्रयत्न चालविले. अखेर १८७७ मध्यें त्याला यश आलें. त्यानें आपला परवाना मद्रास स्टाफ कोअरच्या मेजर जनरल द ला पोअर बेरेसफर्ड आणि त्याचे सहकारी ह्यांना विकला; त्यांतून पुढें कोलार कन्सेशनरीज कंपनी लि. अस्तित्वांत आली. ह्या कंपनीचें भांडवलहि लवकरच संपुष्टांत आलें. नवीन भांडवल उभारून उरगम कंपनी ऑफ मद्रास लि. ची स्थापना करण्यांत आली. कोलारमधील सोन्याच्या हकीकतीचा प्रसार झाला. १८८१ मध्यें अकरा कंपन्यांची स्थापना झाली होती. परंतु त्यांपैकी बहुतेक सर्व कंपन्यांचीं कामें लवकरच बंद पडलीं.

१८८० मध्यें लंडनच्या मेसर्स जॉन टेलर अँड सन्सकडे विचारणा करून त्यांनीं सोन्याच्या उत्खननाचें काम हातीं घ्यावें, असें सुचविण्यांत आलें. त्यांनीं त्याप्रमाणें काम सुरू केलें; निराश न होतां काम चालू ठेवण्याचें विशेष श्रेय जॉन टेलर, कॅप्टन प्लुमर आणि बेल डेव्हिस या त्रयींना दिलें जातें. ५ ऑक्टोबर १८८८ रोजीं कंपनीची लंडनमध्यें सभा भरली, त्या वेळीं सोन्याच्या खाणीचा धंदा बंद करून तोटा थांबवावा, अशी कित्येक भागीदारांनीं मागणी केली. पण जॉन टेलरनें त्यांना घाई न करण्याचा सल्ला दिला. लवकरच अत्यंत मौल्यवान असा सोन्याचा शोध त्यांना लागला. जॉन टेलरची दूरदृष्टि, आत्मविश्वास, धैर्य आणि उत्कृष्ट सल्ला ह्यांच्या अभावीं कोलारच्या खाणींचा उत्कर्ष कधींच झाला नसता; अपयशाचें स्मारक म्हणूनच त्या उरल्या असत्या.


जॉन टेलर अँड सन्स ह्या फर्मची स्थापना १७९८ मध्यें झालेली असून जगांतील सर्व प्रदेशांतून ती खाणींचा धंदा करीत आहे. फर्मच्या संस्थापकाच्या नातवानें कोलारमधील सोन्याच्या खाणींचा धंदा भरभराटीस आणला. ८० वर्षांच्या कोलार खाणींच्या इतिहासांत, सोन्याच्या उत्खननासाठीं कित्येक कंपन्या स्थापन झाल्या; त्यांतील बहुतेक बंद पडल्या; कांहीं इतरांत विलीन झाल्या. अखेर फक्त पांच कंपन्या उरल्या. १९३१ मध्यें बालाघाट खाण नंदिदुर्ग कंपनीनें घेतली; आणि १९५३ मध्यें उरगम खाण चँपियन रीफ माइनकडे आली; अशा रीतीनें तीनच मोठ्या कंपन्या उरल्या.

म्हैसूर सरकारच्या सूचनेवरून १९५० मध्यें नव्या कंपन्या उभारून नोंदण्यांत आल्या; त्या कंपन्यांचें सर्व भांडवल जुन्या ब्रिटिश कंपन्यांनींच घेतलें. कंपन्यांच्या व्यवहाराच्या मुख्य कचेरीचें लंडनमधून कोलार गोल्ड फील्डसमध्यें स्थलांतर करण्यांत आलें. जॉन टेलर अँड सन्सच्या दुय्यम कंपनीकडे खाणींची प्रत्यक्ष व्यवस्था सोंपविण्यांत आली.

कोलारमधील सोन्याच्या उत्खननाचा धंदा सरकारी मालकीचा करण्याचा आपला मनोदय म्हैसूर सरकारनें १९५५ मध्यें जाहीर केला. सरकारनें तीनहि कंपन्या विकत घ्याव्या आणि त्यांची किंमत म्हणून १ कोटी ६४ लक्ष रुपये द्यावेत असें ठरलें. मालकीचा हा बदल २९ नोव्हेंबर १९५६ रोजीं घडून आला आणि म्हैसूर, चँपियन रीफ व नंदीदुर्ग या खाणींबरोबर वीजनिर्मिति केंद्र आणि कोलारच्या खाणींतील इस्पितळ हीं सर्व म्हैसूर सरकारच्या मालकीचीं बनलीं. १९,००० लोकांना प्रत्यक्ष उद्योग पुरविणारा आणि १ लक्ष लोकांचें पोट भरणारा हा धंदा म्हैसूर सरकारच्या ताब्यांत गेला. त्यानंतर जॉन टेलर अँड सन्स ह्यांच्याकडून व्यवस्थापनाचें काम काढून घेतलें गेलें; पण त्या फर्मची खाणींचे सल्लागार म्हणून नेमणूक करण्यांत आली.

कोलारच्या खाणी सुरू झाल्यापासून त्या म्हैसूरच्या ताब्यांत येईपर्यंत त्या सरकारला रॉयल्टीच्या आणि करांच्या रूपानें एकूण २७ कोटी रुपये मिळाले. खाणींना मोठ्या प्रमाणावर वीज लागते, त्यामुळेंच म्हैसूर सरकारच्या वीजनिर्मितीच्या योजना एवढ्या यशस्वी झाल्या.

उत्तरेकडे श्रीनिवासपूर आणि दक्षिणेकडे कृष्णगिरी ह्यांच्या दरम्यानच्या ५० मैल लांबीच्या आणि ३ मैल रुंदीच्या पट्टींत कोलारच्या खाणी आहेत; मध्यभागचा ५ मैलांचा पट्टा सर्वांत जास्त सुवर्णमय आहे.




म्हैसूर राज्यांतील सोन्याच्या खाणी उत्तरेस श्रीनिवासपूर व दक्षिणेस कृष्णगिरी यांच्या दरम्यान कोलार येथें आहेत.

म्हैसूर सरकारच्या अखत्यारींत असलेल्या कोलारच्या सोन्याच्या खाणी १ डिसेंबर, १९६२ पासून मध्यवर्ती अर्थखात्याकडे आल्या. आतां ह्या खाणींचा कारभार एक व्यवस्थापक मंडळ पाहात असून स्वत: अर्थमंत्री त्याचे अध्यक्ष आहेत.

गेल्या चार वर्षांचा आढावा घेतला, तर खाणींचें उत्पादन घटत आहे असें दिसून येईल. उत्पादन घटत आहे इतकेंच नव्हे, तर उत्पादनाचा खर्चहि वाजवीपेक्षा अधिक आहे. खाणींतील सोन्याच्या उत्पादनाचा खर्च दर औंसास ३६७ रु. एवढा येतो, पण इंटरनॅशनल मोनेटरी फंडानें निश्चित केलेली सोन्याची आंतरराष्ट्रीय किंमत दर औंसास फक्त १६७ रु. आहे. सोन्याचा जास्त अंश असलेले साठे शोधून काढून उत्खनन आणखी काटकसरीनें करणें अत्यावश्यक झालें आहे. सोनेंमिश्रित दगडांत प्रत्येक टनामागें ७·०७ पेनी वजनाइतकें सोनें १९५२ मध्यें आढळलें; १९६०–६१ मध्यें त्याचें प्रमाण ४·८१ पेनी इतकें खाली उतरलें. हिंदी बाजारांतील सोन्याची किंमत कृत्रिम कारणांमुळें औंसास २७५ रु. ची ३५९ रु. झाली, म्हणूनच कोलारच्या खाणींचें काम चालूं राहूं शकलें. १९६०–६१ मध्यें सोन्याच्या उत्पादनाला ४·९१ कोटी रु. खर्च आला आणि त्याची आंतरराष्ट्रीय दरानें किंमत २·३४ कोटी रु. भरली! अर्थमंत्र्यांच्या कल्पनेप्रमाणें सोन्याचा अंतर्गत भावहि उतरला, तर खाणींतून सोनें काढावयाचें तरी कशासाठी, असा प्रश्न उपस्थित होईल. खाणी चालू ठेवाव्या, तर सरकारला दरसाल तोटा सोसावा लागणार, आणि खाणी बंद केल्या तर खाणीकामगारांवर बेकारीची पाळी येऊन आपत्ति ओढवणार, अशी ही समस्या आहे. सोन्याच्या उत्पादनाच्या खर्चापैकी कामगारांच्या वेतनाला ४५% रक्कम अधिक लागते, ह्यावरून यंत्रांचा अधिक प्रमाणावर वापर करणें हाच काटकसरीचा प्रभावी मार्ग उपलब्ध आहे, असें दिसून येईल.

म्हैसूर खाणींची स्थिति, डॉक्टरांच्या भाषेत सांगायचें म्हणजे काळजी करण्यासारखीच आहे. आणखी पांच-सात वर्षें पुरेल एवढाच सुवर्णयुक्त दगडांचा सांठा आतां शिल्लक आहे. दैवाच्या कृपेनें तोंपर्यंत नवीन कांहीं सांठा सांपडल्यास ठीक; नाहीं तर ती खाण कदाचित् बंद करावी लागेल. (पण सध्यां त्याच खाणीला फायदा होत आहे.)

चँपियन खाण २७ ऑक्टोबर, १९६२ रोजीं आगीमुळें निम्मी बंद करावी लागली, ती ४ फेब्रुवारी, १९६३ रोजीं उघडली ह्या खाणींचें अतिशय नुकसान झालें असून बराच काळ तिचें उत्पादन कमीच राहील. ही खाण आतां १०,५०० फुटांपर्यंत खोल गेली आहे.

नंदीदुर्ग खाण ठीक चालली आहे. तिचें द. म. उत्पादन २०,००० पासून २८,००० टनांपर्यंत वाढविण्यांत येत आहे. सध्यां तिचें उत्पादन २४,००० टन आहे.

नवीन सोन्याच्या जागा सांपडण्यावर खाणींचें भवितव्य बरेंच अवलंबून आहे. त्यासाठी शोध चालूं असून तीन-चार जागीं नवीन खाणकाम सुरू व्हावें, असें सुचविण्यांत आलें आहे.

आंतरराष्ट्रीय किंमतीपेक्षा कमी उत्पादन खर्च असणारी सोन्याची खाण द. आफ्रिकेंतहि नाहीं. सरकारच्या सबसिडीवरच हा धंदा ह्यापुढें चालू ठेवावा लागणार आहे. म्हणजे दारूबंदीसाठी जनतेला जसा भुर्दंड पडतो, तसाच भुर्दंड खाणबंदी टाळण्यासाठी पडत राहाणार आहे. सरकारच्या सोनेंविषयक धोरणाचा फारच गंभीर परिणाम कोलार खाणींवर होण्याचा संभव आहे. खाणींचें राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर कामगारांच्या बोनसमध्यें, नफ्याचा विचार न करतां, वाढ होत चालली आहे; उलटपक्षीं, टिंबर, सीमेंट, ग्रॅनाइट, सुरुंगाची दारू, इत्यादींचा खर्च वाढत चालला आहे. यंत्रांचा वापर अधिक प्रमाणावर करण्याची तूर्त शक्यता नाहीं; कारण खाणींची आजची योजना त्या दृष्टीनें केलेली नाहीं. उदाहरणार्थ, सोन्याच्या दगडांतून खणलेले ७०० मैलांचे बोगदे यांत्रिकीकरणास सोईचे नाहींत. अशा रीतीनें कोलारच्या खाणींपुढें अनेक समस्या आहेत. भारतांतील सोन्याची किंमत उतरविण्याच्या सरकारी धोरणामुळें 'गंडस्योपरि पिटिका संवृत्ता' अशी त्यांची स्थिति झाली आहे.

— श्री. वा. काळे

"चित्रमयजगत्" एप्रिल १९६३

## युरोपमधील अणुशक्ति मंडळाचा अहवाल

युरोपच्या अणुशक्ति मंडळाचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करण्याच्या सध्यांच्या अवस्थेचा परामर्श घेऊन अहवालांत असें म्हटलें आहे कीं, अणुशक्तीच्या साह्यानें उत्पन्न करण्यांत येणारी वीज इतर पद्धतींनें उत्पन्न करण्यांत येणाऱ्या विजेशीं स्पर्धा करूं शकेल. १९६३ सालापासून १९७० पर्यंतच्या काळांत अणुशक्तीवरील वीज आर्थिक दृष्ट्या परवडूं लागेल असा अंदाज आहे. सध्यां अणुशक्तीच्या साह्यानें निर्माण करण्यांत येणारी वीज पश्चिम युरोपांत प्रयोगाच्या अवस्थेंत आहे. परंतु पुढील ५–७ वर्षांच्या अवधींत तिचा व्यावहारिक उपयोग सुरू होईल. त्यामुळें युरोपच्या अर्थव्यवस्थेंत तिला महत्त्वाचें स्थान प्राप्त होईल. अणुशक्तीच्या साह्यानें मोठ्या प्रमाणावर विजेचें उत्पादन सुरू झालें तरी नेहमींच्या पद्धतीनें उत्पादन करण्यांत येणाऱ्या विजेच्या खपाला शह बसेल असें मानण्याचें कारण नाहीं. युरोपला लागणाऱ्या औद्योगिक शक्तीच्या मागणींत गेल्या कांहीं वर्षांत खूपच वाढ होणार आहे. त्यामुळें अणुशक्तीवरील वीज व मामुली पद्धतीनें निर्माण केलेली वीज ह्या दोहोंनाहि भरपूर मागणी राहणार आहे. अणुशक्तीच्या साह्यानें उत्पादन करण्यांत आलेली वीज औद्योगिक उत्पादनासाठी वापरण्यांत येऊं लागली म्हणजे अर्थव्यवस्थेंत कांहीं बदल घडवून आणणें अपरिहार्य ठरणार आहे. ह्या बदलामुळें अर्थव्यवस्थेचीं चाकें अडखळूं नयेत म्हणून आतांपासूनच उपायांचा शोध सुरू करण्यांत आला आहे. अर्थव्यवस्थेंत एकदम उलथापालथ होण्याची भीति त्यामुळें खोटी ठरणार आहे.

## लोकसंख्येंतील हिंदूंचें प्रमाण घटलें

भारतामधील मुसलमान, ख्रिश्चन, शीख, ह्यांसारख्या धार्मिक जमातींच्या लोकसंख्येंत होणारी वाढ लक्षांत घेतां गेल्या दहा वर्षांच्या काळांत हिंदु जमातींतील लोकसंख्येची वाढ कमी प्रमाणांत होत आहे, असें आढळून आलें आहे. शिरगणतींत नमूद केलेल्या आंकड्याप्रमाणें १९५१ मध्यें प्रत्येक १००० लोकांत हिंदूंची संख्या ८५० होती. १९६१ मध्यें हें प्रमाण ८४० आढळून आलें. मुसलमानांची दर हजारी संख्या ९९ वरून १०२ वर आली. ख्रिश्चनांची संख्या २३ पासून २४ वर आली आणि शिखांची १७ पासून १८ वर आली. १९६१ सालीं दर हजारांत एक बौद्ध होता. आता त्यांची दरहजारी संख्या ८ झाली आहे. कांहीं हिंदु स्वतःस बौद्ध म्हणवूं लागले आहेत.

## मोटारीच्या चोऱ्या थांबविण्यासाठी उपाय

सिंगापूरमध्यें मोटारींच्या चोऱ्या करणाऱ्या संघटित गुन्हेगार टोळ्यांचा उपद्रव फार होत असतो. ह्या टोळ्या मोटारी चोरून त्या गुप्तपणें इंडोनेशिआला पाठवितात अगर त्या उत्तरेकडे पळवून मलाया मार्गानें सयाममध्यें नेतात. मोटारी चोरल्या जाऊं नयेत म्हणून इशारा देणारा एक यांत्रिक उपाय आतां योजण्यांत येत आहे. ह्या उपायासाठी सुमारें १० डॉलर्स खर्च येतो. मोटारीचा भोंगा वाजविणारी एक मुख्य कळ गाडींत बसविण्यांत येते व ती दरवाजाशीं जोडण्यांत येते. ही कळ बंद न करतां जर कोणी ड्रायव्हरजवळचा दरवाजा उघडला तर एकदम भोंगा वाजूं लागतो व त्या मोटारीकडे लक्ष वेधलें जातें. ह्या मुख्य कळीची जागा फक्त मालकालाच माहीत असते.

## धरणांच्या पाण्याचा उपयोग करण्यांत येत नाहीं

मध्यवर्ती सरकारचे अन्नमंत्री श्री. स. का. पाटील मुंबई येथें बोलतांना म्हणाले कीं, हिंदमध्यें अलीकडे बांधण्यांत आलेल्या धरणांच्या पाण्याच्या साह्यानें जी वीज निर्माण करण्यांत येते तिचा पूरेपूर उपयोग करून घेण्यांत येतो. परंतु ह्या पाण्याचा शेतीसाठीं उपयोग मात्र पूर्णतः करून घेण्यांत येत नाहीं. दामोदर खोरें कॉर्पोरेशननें अडविलेल्या पाण्यासंबंधीं तर असे म्हणतां येईल कीं, ह्या पाण्याचा शेतीसाठी मुळींच उपयोग करण्यांत येत नाहीं. हीच परिस्थिति हिराकूड, तुंगभद्रा व इतर मोठ्या पाणी पुरवठ्याच्या धरणासंबंधीं आहे. कोट्यवधि रुपये खर्चून बांधलेल्या ह्या धरणांच्या पाण्यापासून सरकारला कांहीं प्राप्ति होत नाहीं.

## दारुड्यासाठी प्रभावी शिक्षा

अमेरिकेंतील ॲटलांटा शहरांतील दारुड्यांना दारूपासून परावृत्त करण्यासाठीं नवीन प्रकारची शिक्षा देण्यांत येऊं लागली आहे. दारू पिऊन मोटार चालविणें, दंगामस्ती करणें, इत्यादि गुन्ह्यांसाठी अशा लोकांना तुरुंगांत धाडण्यांत येत असे. परंतु आतां त्यांना तुरुंगाची वाट दाखविण्यांत येत नाहीं. त्याऐवजीं त्यांनीं म्युनिसिपल कोर्टांत हजेरी लावून एका औषधाची गोळी घेतली कीं काम भागतें. ह्या गोळीचा गुण असा आहे कीं, ती घेतल्यानंतर जर मद्यपान केलें तर मद्यप्याला ओकाऱ्या होतात, अगर छातींत धडधड होते, अगर सपाटून ताप चढतो. हा उपाय एका मानसशास्त्रज्ञाच्या सूचनेप्रमाणें योजण्यांत आला आहे.


# जयां अंगीं मोठेपण

ह्या नव्या पुस्तकांत श्री. वा. काळे यांनीं आपल्या रसिकतेचा व वैशिष्ट्यपूर्ण साहित्यसेवेचा नवा पट्टा गांठला आहे. चरित्रविषयक प्रत्येक व्यक्तीच्या जीवनपद्धतीशीं, आकांक्षांशीं व वैशिष्ट्यांशीं समरस होऊन पाहण्याची विशेष दृष्टि कमावल्यानें श्री. काळे यांचा प्रत्येक लेख आगळ्या सौंदर्यानें खुलला आहे.

### १४ व्यक्ति–चित्रें

| | |
|---|---|
| विजय मर्चंट | तारा देवधर |
| ध. रा. गाडगीळ | ज्योत्स्ना भोळे |
| मो. वा. चिपळूणकर | मधुमालती गुणे |
| केशवराव भोळे | इंदिराबाई देवधर |
| मालवा केळकर | रोहिणी भाटे |
| 'डॉडालेस' जोशी | शि. वा. दामले |
| विमल सोहोनी | माधवराव वाकडे |

पृष्ठसंख्या ११६ — चित्रसंख्या १५ — किंमत रु. ३

**व्हीनस प्रकाशन**

३८१ क, शनिवार पेठ, पुणें २.

## डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, पुणें

### व्यापारी पारिभाषिक शब्दकोशाचें प्रकाशन

येथील डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्सचे संस्थापक प्रा. गणेश कृष्ण भोपटकर यांनीं संपादन केलेल्या व लिहिलेल्या व संस्थेनें प्रकाशित केलेल्या 'व्यापारी पारिभाषिक शब्दकोश' या ग्रंथाचें प्रकाशन किर्लोस्कर ब्रदर्स लि. च्या संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ. डी. एस्. ऊर्फ भाऊसाहेब सरदेसाई यांचे अध्यक्षतेखालीं मंगळवार दि. २६ मार्च, १९६३ रोजीं गुढीपाडव्याचे दिवशीं पार पडलें. सुरुवातीस संस्थेचे उपाध्यक्ष श्री. भाऊसाहेब क्षीरसागर यांनीं प्रास्ताविक भाषण करून अध्यक्षांचा परिचय करून दिला. हा 'गुढीपाडवा' ह्या ग्रंथाचे लेखक गुरुवर्य नानासाहेब भोपटकर यांचा ७१ वा वाढदिवस असल्यानें समारंभास विशेष महत्त्व असल्याचेंहि त्यांनी सांगितलें. नंतर संस्थेचे श्री. वसंतराव रिसबूड यांनीं ग्रंथाचा परिचय करून दिला. शब्दकोशांत एकूण २,५३४ शब्द व १९५ ॲब्रिव्हिएशन्स व जरूर तेथें शब्दांना पूरक अशा टीपा असल्याचें त्यांनीं सांगितलें. नंतर अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब सरदेसाई यांनीं ग्रंथ प्रकाशित झाल्याचें जाहीर केलें. किर्लोस्कर मासिकाचे संपादक श्री. मुकुंदराव किर्लोस्कर यांनीं नंतर भाषण करून प्रा. भोपटकरांच्या कार्याचा व शब्दकोशाचा यथोचित शब्दांत गौरव केला व महत्त्व पटवून दिलें. नंतर किर्लोस्कर ब्रदर्स लि. व बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे संचालक रावबहादुर एम्. बी जांभेकर यांनींहि भाषण केलें. प्रा. नानासाहेब भोपटकर यांचा त्यानंतर त्यांचे वाढदिवसानिमित्त सपत्नीक सत्कार करण्यांत आला. प्रा. भोपटकर यांनीं उत्तरादाखल भाषण केल्यावर संस्थेचे सेक्रेटरी श्री. शंकरराव धुपकर यांनीं आभार मानल्यावर हा समारंभ संपला.

---

### इजिप्शिअन संस्कृतीचे भग्नावशेष

इजिप्तमध्यें बांधण्यांत येत असलेल्या आस्वान येथील प्रचंड धरणामुळें इजिप्तच्या प्राचीन संस्कृतीचे भग्नावशेष धरणाच्या पाण्याखालीं जाणार आहेत. दगडांत खोदलेले हे अवशेष अतिशय भव्य आहेत. संयुक्त–राष्ट्र-संघटनेच्या सांस्कृतिक संघटनेनें ते तेथून हलविण्यासाठी प्रयत्न चालविले आहेत. हें काम अवघड तर आहेच, पण त्यासाठी अवाढव्य खर्चही येणार आहे. ह्या कामीं मदत म्हणून भारत सरकारनें आपले कांहीं तज्ज्ञ व यंत्रसामग्री देऊं केली आहे. यंत्रसामग्रीची किंमत २८ लाख रुपये आहे. सध्यां भारताच्या तिजोरीवर संरक्षणविषयक खर्चाचा मोठा ताण पडत आहे. तरीहि संयुक्त–अरब प्रजासत्ताकाला सदिच्छा दाखविण्यासाठी भारत सरकार खर्च सोसणार आहे.

### सिमेंटचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न

भारत सरकारच्या पोलाद आणि भारी उद्योगधंद्याच्या खात्यानें येत्या तीन वर्षांत सिमेंटचें उत्पादन करणारे १६ नवे कारखाने काढण्याचें ठरविलें आहे. हे कारखाने उत्पादन करूं लागल्यावर तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारतामधील सिमेंटचें उत्पादन १·४ कोटी टनांपर्यंत वाढेल. पण तरीसुद्धां तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत योजलेल्या उद्दिष्टापेक्षा उत्पादन कमीच राहील. सिमेंट तयार करणाऱ्या कारखान्यांची यंत्रसामग्री तयार करण्यासाठी ५ कंपन्यांना परवाने देण्यांत आले होते. परंतु त्यांतील दोनच कंपन्यांनीं समाधानकारक काम केलेलें आहे. बाकीच्या तीन कंपन्याहि लवकरच यंत्रसामग्री तयार करण्याच्या मागण्या नोंदवूं लागतील. सिमेंटच्या कारखान्यांची यंत्रसामग्री देशांतच तयार करण्याच्या निर्णयामुळें प्रत्येक कारखान्यामागें ३० लाख रुपयांचें परदेशीय चलन वांचणार आहे. सध्यां एक सिमेंटचा कारखाना उभारण्याच्या कामीं ४५ लाख रुपये परदेशीय चलनांत खर्च करावे लागतात. परंतु १९६५–६६ च्या सुमारास परदेशीय चलनाच्या स्वरूपांतील खर्च १० लाख रुपयांपर्यंत खाली येईल असा अंदाज आहे. सिमेंट तयार करण्यासाठी चुनखडीचा दगड लागतो. ज्या ठिकाणीं चुनखडीचा दगड सांपडतो त्या प्रदेशांतील दगडाचा दर्जा निश्चित करण्यासाठी एक संघटना सिमेंटचे कारखानदार स्थापन करणार आहेत. सिमेंटच्या कारखान्यांना लागणारी यंत्रसामग्री तयार करणाऱ्या कारखान्यांवर यंत्रसामग्रीच्या दर्जाविषयीं कांहीं निर्बंध घालण्याचा विचार करण्यांत येत आहे. यंत्रसामग्रीची गुणवत्ता ठराविक पातळीवर राखण्यांत येणार आहे.

---

### कोचीन येथील बोटी बांधण्याचा कारखाना

भारतामधील दुसरा बोटीचा कारखाना कोचीन येथें काढण्यांत येण्याचा संभव आहे. ह्या धंद्यांतील जपानच्या तज्ज्ञांनीं कोचीन बंदराची ह्या दृष्टीनें पाहणी केलेली असून त्यांच्या दृष्टीनें कोचीनची भौगोलिक परिस्थिति सर्वांत अधिक अनुकूल आहे. जपानी तज्ज्ञांचा अहवाल आतां लवकरच मध्यवर्ती सरकारकडे येईल. सरकारनें तो मंजूर केल्यास कोचीनमध्यें ५०,००० टन वजनाचीं जहाजें बांधतां येतील.

---

### जपानकडून विजेचीं रेल्वे इंजिनें

जपानमधील सुप्रसिद्ध हिटाची कंपनीकडून ४५ विजेचीं रेल्वेइंजिनें घेण्याचा करार भारतीय रेल्वेनें केलेला आहे. इंजिनें तयार करण्याच्या कामांत आणखी तीन कंपन्या सहकार्य करणार आहेत. हिटाची कंपनी विजेचीं इंजिनें तयार करण्यांत निष्णात समजली जाते. सर्व इंजिनांची मिळून किंमत ४·८ कोटी रुपये होईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.